महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission

निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/०७/२०१८/७३९

| | |
|---|---|
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक | : २५.०९.२०१८ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याचा दिनांक | : २७.०९.२०१८ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | : १७.१०.२०१८ |
| प्रथम अपील निकाली काढल्याचा दिनांक | : १८.१२.२०१८ |

**समक्ष प्रथम अपीलीय अधिकारी**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई**

**(माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम १९ अंतर्गत.)**

## अपील क्र. ०७/२०१८

**अपीलकर्ता :** श्री. रावसाहेब आहिरे,

**विरुदध**

**प्रतिवादी :** जन माहिती अधिकारी, मविनिआ, मुंबई

**अपिलाचे तथ्य :-**

१) अपिलकर्ता यांनी दिनांक २५.०९.२०१८ रोजी माहिती अधिकार कायद्याअंर्तगत अर्ज केला. त्यानुसार प्रतिवादी यांनी दिनांक २७.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी दिनांक १७.१०.२०१८रोजी वरील अपिल दाखल केले आहे.

२) प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक १९.१०.२०१८, दि. २६.१०.२०१८ व १५.११.२०१८ रोजी नोटिस पाठवून व दिनांक १४.१२.२०१८ रोजी मौखिक स्वरुपाने कळवून दिनांक १८.१२.२०१८ रोजी सुनावणी आयोजीत करून सुनावणी घेतली. अपिलावर अपिलार्थी व प्रतीवादी यांना आपली सक्षम बाजू मांडण्याची संधी दिली व त्यांनी समक्ष उपस्थिती राहुन आपले म्हणणे मौखीक स्वरुपात सादर केले.

३) माहिती अर्ज लक्षपूर्वक गृहित धरुन व त्याला प्रतिवादी यांचे आदेश/उत्तर व या अपिलातील मुद्यांना धरुन नस्तितील पुराव्याच्या आधारे अपिल निकाली काढण्यात येत आहे.-

**मागितलेली माहिती:-**

१. श्री. शरद राजाराम जगताप यांस सिटी सिव्हील कोर्टाने सेपरेट रहिवासी मिटर न देण्याचे आदेश दिले पण हायकोर्टाने मेरिटवर कमर्शियल मिटर देण्याचे आदेश दिले. कोणतीही बीएमसी व सोसायटीची परमिशन नसतांना व ४४० व्होल्टचे रिलायन्सने मिटर देउन दोन्हीही कोर्ट ऑर्डरचा अवमान केला असून शरद जगतापचे वडील स्टेशनच्या त्यांच्या दुकानात चोरुन लाईन दुसऱ्यांना देतात तरी त्यांच्यावर पोलीस केस होत नाही, या आशयाचा पत्रव्यवहार आम्ही गेल्या जानेवारी महिन्यापासून करत आहोत त्यावर जी कार्यवाई आपण केली त्यासंबंधीचे कागदपत्रे व माहिती द्यावी.

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
Tel.: 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 Fax : 022-2216 3976
E-mail : mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in Website : www.merc.gov.in / www.mercindia.org.in

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर :-**

आपणांस आवश्यक असलेली माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नाही. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये प्रकरण १ मधील २ (फ) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवह्या, संविदा, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने (मॉडेल) , कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायाद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधीत माहिती, यांचा समावेश होतो. त्यानुसार आपणांस नेमके कोणते दस्तावेज हवेत याचा बोध होत नाही.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण :-**

माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये अपिलार्थी यांनी दिनांक १७.१०.२०१८ रोजी दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने पुरेशी माहिती न मिळाल्यामुळे.

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे :-**

१. अपिलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती, हि दस्तऐवज व अन्य कुठल्याही प्रकारची नसून ती माहिती अधिकार कायाद्यांतर्गत येत नसून ती तक्रार आहे व त्या तक्रारीवर काय कार्यवाही झाली अशी विचारणा केली असल्यामुळे, अपिलार्थी यांना माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती/उत्तर योग्य असल्याचे दिसून येते. करीता माहिती अधिकारी यांचे आदेशात हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांना आयोगाच्या कोर्ट केसेस मध्ये हजर राहणे करीता नागपूर व दिल्ली येथे जाण्यास भाग पडले त्या कारणास्तव वेळोवेळी सुनावणी तहकुब करून पूढे घेण्याचे कळविले. अपिलार्थी यांनी त्याच्या वैयक्तीक कारणास्तव सुनावणीस हजर राहण्याची असमर्थता दर्शवीली त्या कारणाने अपिलार्थी यांना पुन्हा पुढील संधी देवून दि.१८.१२.२०१८ रोजी सूनावणी घेवून त्याच दिवशी अपील निकाली काढण्यात आले. करीता सदरहू अपील निकाली काढण्यात येत आहे

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

## निर्णय

१) अपिलार्थी यांची अपिल निकाली काढण्यात येत आहे.

१८.१२.२०१८

(अनिलकुमार उके)

**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी.**

प्रति,
श्री. रावसाहेब आहिरे,
अध्यक्ष, आसरा को-ऑप. सोसायटी लि.,
३,आसरा बिल्डींग, बाम्हणवाडी,
कुर्ला (प), मुंबई- ४०० ०७०.

प्रतीलिपी- जनमाहिती अधिकारी, मविनिआ यांना निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरीता रवाना.

१८.१२.२०१८

(अनिलकुमार उके)

**उपसंचालक (विधी) तथा प्रथम अपिलीय अधिकारी**